# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २६२९२१०२
E-mail :- 12desk@gmail.com internet:- www.dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे**

क्रमांक : १२/आस्था(१)/२०१९/२७ 445
दिनांक : 22 JAN 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

पहा : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमधील गट क संवर्गातील "निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)]" या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियम करणारे नियम

उपरोक्त विषयाबाबतचे, शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार -अ, अधिसूचना दि. ९.१.२०१९ या संचालनालयास प्राप्त झाली आहे. (प्रत सोबत जोडली आहे)

सदर अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आलेल्या नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकारी या नात्याने पुढील योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. तसेच अधिसूचनेची प्रत सर्व संबंधिताना संस्थाप्रमुखांमार्फत निदर्शनास आणून देण्यात यावी.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई

::**महत्त्वाचे**::

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/ 445
दिनांक:- 1 FEB 2019

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय संस्था,
सर्व अशासकीय अनुदानित संस्था,
औरंगाबाद विभाग.

आपणास कळविण्यात येते की,उपरोक्त तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पत्रातील निर्देशानुसार आपल्या संस्थेत कार्यरत असलेल्या गट-क संवर्गातील "निदेशक (प्रयोगशाळा सहायक-तांत्रिक)"या पदावरील सेवाप्रवेशाचे विनियम करणा-या नियमातील तरतुदी तसेच अधिसुचनेची प्रत आपल्या स्तरावरुन संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

**सोबत:-अधिसूचनेची प्रत**

प्रत:-संस्थेच्या ई-मेल आय-डी वर माहिती व पुढील कार्यवाहीस्तव उपलब्ध करुन देण्यासाठी.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

Indorsment

RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक ४(३)] बुधवार, जानेवारी ९, २०१९/पौष १९, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी २०१९

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक न्यायाप्र-२२१३/(१४१/१७)/तांशि-२.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून ; आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले सर्व नियम, आदेश आणि अनुदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमधील गट-क संवर्गातील " निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)] " या पदांवरील सेवा प्रवेशाचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमधील निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)] (सेवा प्रवेश) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " नियुक्ती प्राधिकारी " याचा अर्थ निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)] या पदांवर नेमणुका करण्यास जो सक्षम आहे असे संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे सहसंचालक ;

(ख) " मंडळ " याचा अर्थ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण कायदा, १९९७ (सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८) नुसार स्थापित महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, असा आहे ;

(ग) " परिषद " याचा अर्थ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद कायदा, १९८७ नुसार स्थापित अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद असा आहे ;

(घ) " विभाग " याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, असा आहे ;

(च) " पदविका " याचा अर्थ, परिषदेने मान्यता दिलेली मंडळाची यंत्र अभियांत्रिकी किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत व दूरसंचरण अभियांत्रिकी किंवा अणुविद्युत व संचरण अभियांत्रिकी किंवा संगणक अभियांत्रिकी किंवा संगणक तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी किंवा रसायन अभियांत्रिकी किंवा रसायन तंत्रज्ञान किंवा उपकरणीकरण अभियांत्रिकी किंवा औद्योगिक अणुविद्युत अभियांत्रिकी किंवा स्वयंचल अभियांत्रिकी यापैकी कोणत्याही विद्याशाखेतील पदविका परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, असा आहे आणि त्यामध्ये मंडळाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही पदविका याचा समावेश होतो ;

(छ) " संचालनालय " याचा अर्थ तंत्रशिक्षण संचालनालय, असा आहे ;

(ज) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) " शासकीय संस्था " याचा अर्थ तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील, शासनाद्वारे स्थापित व संचालित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने, प्रिंटींग टेक्नॉलॉजी पदविका संस्था आणि हॉटेल मॅनेजमेंट व कॅटरींग टेक्नॉलाजी पदविका संस्था असा आहे ;

(ट) " उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१) अन्वये गठीत केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(ठ) " अशासकीय अनुदानित संस्था " याचा अर्थ तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, वास्तुशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने असा आहे;

(ड) " प्रादेशिक विभाग " याचा अर्थ तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील प्रादेशिक विभाग असा आहे.

३. निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक)] पदावरील नेमणुका पुढीलप्रमाणे कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(क) (एक) प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या ; आणि

(दोन) ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा भौतिकशास्त्र व रसायन शास्त्र या विषयांसह उत्तीर्ण केली आहे ;

अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

**किंवा**

(ख) (एक) एकोणीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या (आरक्षित गटातील उमेदवारासाठी पाच वर्षापर्यंत उच्च वयोमर्यादा शिथिल केली जाऊ शकते) ; आणि

(दोन) पदविका धारण करणाऱ्या ; आणि

(तीन) शासकीय किंवा निमशासकीय किंवा खाजगी, संस्था किंवा आस्थापना, किंवा शासन अंगीकृत महामंडळामधील प्रयोगशाळा सहाय्यक किंवा साईट सुपरवायजर पदावर, किंवा त्याने धारण केलेल्या पदविकेच्या विद्याशाखेशी संबंधित मॅन्युफॅक्चरिंग किंवा सर्व्हिसींग किंवा मेंटेनन्स किंवा सीएनसी मशीन हाताळण्याचा रोजंदारी किंवा कार्यव्ययी किंवा करार पद्धतीवर किंवा मानधन इत्यादी स्वरुपात पूर्ण वेळ कामाचा एक वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या ;

उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने व पदोन्नतीने नियुक्ती ७५ : २५ या प्रमाणात राहील.

परंतु असे की, पदोन्नतीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पदोन्नतीचे प्रमाण शिथिल करून उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्ती करता येईल.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यांत आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

६. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

७. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती, नियुक्त केलेल्या प्रादेशिक विभागातंर्गत कोठेही बदलीस पात्र ठरेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश ज. तिडके,**
शासनाचे उप सचिव.